PDF Compressor Free Version




RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR

■ Volume - 72 ■ Issue- 197 ■ Marathi Daily ■ Friday 12/4/2024 ■ Pages - 6 ■ Price- Rs. 3






संपादकीय

# आर्थिक विषमतेतील वाढ चिंताजनक

भारतात दर वर्षी आर्थिक विषमतेची आकडेवारी जाहीर केली जात असते. आता लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर यंदाची आकडेवारी समोर आल्याने टीका होत आहे. त्यातही मोदी सरकारच्या कार्यकाळात आर्थिक विषमतेची दरी रुंदावत चालली आहे. देश आर्थिक महासत्ता होण्याच्या गप्पा सुरू असताना आर्थिक विषमतेची दरी कमी होईल का, हा खरा प्रश्न आहे. त्याबाबत साकल्याने चर्चा होण्याची गरज आहे. आर्थिक विषमतेसंबंधीच्या ताज्या अहवालात मोदी सरकारच्या काळात आर्थिक विषमता अधिक वाढल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. जागतिक विषमता डेटाबेसने भारतातील आर्थिक असमानतेवर लिहिलेल्या पेपरमधून हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. या अहवालानुसार २०१४ ते २०२२ दरम्यान म्हणजेच मोदी सरकारच्या काळात भारतात आर्थिक विषमता खूप वाढली आहे. याचा सर्वाधिक फायदा भारतातील एक टक्का श्रीमंतांना झाला आहे. गेल्या काही दिवसांपासून डॉ. रघुराम राजन यांच्यासह काही अर्थतज्ज्ञ त्याबाबत बोलत होते. परंतु, त्यांच्यावर शिक्का मारून त्यांच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. राहुल गांधी या विषयावर वारंवार बोलतात; परंतु त्यांच्या म्हणण्याकडे कुणी गांभीर्याने पाहिले नाही. आता जागतिक संस्थेच्या अहवालानंतर तरी आपले डोळे उघडतील, अशी अपेक्षा करायला हरकत नाही. अर्थात असा अहवाल प्रथमच सादर झालेला नाही; दर वर्षी असे अहवाल येत असतात. त्यावर गांभीर्याने विचार करून उपाययोजना करायला हव्यात; परंतु तशा त्या होत नाहीत.भारतातील आर्थिक विषमतेवर जागतिक विषमता डेटाबेसने प्रसिद्ध केलेल्या पेपरचे शीर्षक आहे, भारतातील आर्थिक विषमता: बिलियनेअर राज. म्हणजे भारतातील आर्थिक विषमतेवर अब्जाधीशांचे वर्चस्व आहे. नितीनकुमार भारती, लुकास चॅन्सेल, थॉमस पिकेट्टी आणि अनमोल सोमांची यांनी हा अहवाल लिहिला आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर १९८० च्या सुरुवातीपर्यंत भारतातील आर्थिक विषमतेची दरी म्हणजेच श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी कमी होत गेली. स्वातंत्र्यानंतर भारतातील आर्थिक विषमता कमी होण्याला समाजवादी धोरणांचा अवलंब कारणीभूत असल्याचा दावा केला जातो. यानंतर १९८२ नंतर देशाची अर्थव्यवस्था श्रीमंतांच्या माध्यमातून पुढे नेण्याची धोरणे सरकारांनी बनवताच आर्थिक विषमता वाढू लागली. २००० नंतर आर्थिक विषमतेची दरी जमीन-आकाशाच्या फरकाने वाढू लागली. भारतातील संपत्ती आणि गरिबी यांच्यातील दरी आता इतकी वाढली आहे, की श्रीमंतांपैकी एक टक्का लोकांकडे भारताच्या एकूण उत्पन्नाच्या २२.६ टक्के आणि एकूण संपत्तीच्या ४०.०१ टक्के संपत्ती आहे. सध्याच्या काळाला मोदी सरकार भारताचा अमृत काळ म्हणते आणि भारताचा समावेश जगातील पहिल्या तीन अर्थव्यवस्थांमध्ये होईल, असा दावा करते. त्याचवेळी देशातील श्रीमंत आणि गरीब यांच्यातील वाढती दरी मोठी आहे, हे लक्षात घ्यायला हवे. या अहवालानुसार, भारताच्या एकूण उत्पन्नात आणि संपत्तीमध्ये पहिल्या एक टक्का श्रीमंतांचा वाटा पूर्वीपेक्षा जास्त आहे. १९५१ मध्ये देशाच्या एकूण उत्पन्नात भारतातील दहा टक्के श्रीमंतांचा वाटा ३७ टक्के होता. १९८२ मध्ये तो तीस टक्क्यांवर आला; पण १९९० नंतर भारतातील टॉप दहा टक्के श्रीमंतांची संपत्ती वाढू लागली. आता देशाच्या एकूण उत्पन्नात त्यांचा वाटा जवळपास साठ टक्के आहे तर दुसरीकडे देशाच्या एकूण उत्पन्नात भारताच्या तळाच्या पन्नास टक्के लोकांचा वाटा फक्त १५ आहे. याचा अर्थ असा की भारतातील शीर्ष पन्नास टक्के लोकांकडे देशातील ८५ टक्के संपत्ती आहे. असे म्हणता येईल की भारतातील आर्थिक धोरणामुळे गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी वाढत आहे.आजघडीला देशातील तळाच्या पन्नास टक्के लोकसंख्येचे वार्षिक सरासरी उत्पन्न केवळ ७१ हजार रुपये आहे, म्हणजे दरमहा केवळ सहा हजार रुपये! त्याच वेळी, भारतातील शीर्ष दहा हजार श्रीमंत लोक देशाच्या दरडोई उत्पन्नापेक्षा २०६९ पट अधिक कमावतात. २०१४ मध्ये भाजपा सत्तेत आल्यापासून असमानतेत लक्षणीय वाढ झाल्याचे अहवालात नमूद केले आहे. राजकीय आणि आर्थिक सुधारणांमुळे मोठे उद्योग आणि सरकार यांच्यातील वाढत्या संबंधांमुळे संभाव्य असमान प्रभावाची सोय झाली आहे. या प्रवृत्तीचा प्रतिकार करण्यासाठी लेखकांनी पोषण, आरोग्य सेवा आणि शिक्षणावरील सार्वजनिक खर्च वाढवण्याचा प्रस्ताव मांडला आहे तसेच श्रीमंत कुटुंबांच्या निव्वळ संपत्तीवर सुपर टॅक्स लावण्याची शिफारस केली आहे. एके काळी महत्त्वाच्या संस्था डेटा राखण्यासाठी प्रसिद्ध होत्या. भारतातील या संस्थांना रोल मॉडेल मानले जात होते. तथापि, असमानतेचा अभ्यास करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या आर्थिक डेटाची गुणवत्ता घसरली आहे. या मुद्द्यावर बारकाईने लक्ष ठेवणे आणि उत्पन्न आणि संपत्तीतील असमानता दूर करण्यासाठी आवश्यक कारवाई करणे महत्त्वाचे आहे. भारत स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षाच्या जवळ येत असताना केवळ विशेषाधिकार प्राप्त काही लोकांऐवजी समृद्धी सर्वांना उपलब्ध आहे, याची खात्री करणे हे आव्हान आहे. हे साध्य करण्यासाठी न्याय्य वितरणासह आर्थिक वाढीचा समतोल साधणे आवश्यक आहे.

## ओबीसी व्हिजेएनटी तर्फे महात्मा फुले यांना अभिवादन



**समाचार/नगर-दि.१२**

सामाजिक प्रबोधन, अस्पृश्यता व जातिव्यवस्थेचे निर्मूलन आणि स्त्रियांना व मागास लोकांना शिक्षण देण्याचे कार्य त्यांनी कार्य केले.महात्मा फुले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले हे दोघे भारतातील स्त्री शिक्षणाचे प्रणेते आहेत. शेतकऱ्यांचे आसूड, गुलामगिरी हे ग्रंथ लिहून सामाजिक परिवर्तनाला दिशा दिली.थोर समाजसुधारक महात्मा फुले यांनी सामाजिक व शैक्षणिक परीवर्तन केले.असे प्रतिपादन माजी नगरसेवक किशोर डागवाले यांनी केले आहे. माळीवाडा येथे ओबीसी व्हिजेएनटीतर्फे थोर समाजसेवक महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी ओबीसी व्हिजेएनटीचे अध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, माजी नगरसेवक किशोर डागवाले, राष्ट्रवादीचे माजी शहर जिल्हाध्यक्ष प्रा. माणिकराव विधाते, बारा बलुतेदार महासंघाचे जिल्हाध्यक्ष माऊली मामा गायकवाड, सकल माळी समाजाचे सुरेश तात्या आंबेकर, डॉ.रणजीत सत्रे, राजेद्र पडोळे, प्रकाश इवळे, अभिजीत चिपाडे, अँड.राहुल रासकर, अनिल इवळे, नारायण इवळे, सुनिल भिंगारे, मच्छिंद्र बनकर, विष्णू पाबळे, भाऊसाहेब कोल्हे, संजय कानडे, गणेश कोल्हे, लवेश गोंधळे, रोहित पठारे, कॅप्टन सुधीर पुंड, चंद्रकांत पुंड, धीरज पडोळे, शाम औटी, संतोष हजारे, वैशाली उदावंत, अनुरीता झगडे आदी उपस्थित होते.

## बौध्द संस्कार संघातर्फे रविवारी 'भीम पहाट' कार्यक्रम



**समाचार/नगर-दि.१२**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरयांच्याजयंतीनिमित्त रविवार दि.१४ एप्रिल रोजी पहाटे ५ वाजता बौद्ध संस्कार संघाच्यावतीने 'भीम पहाट' कार्यक्रमाचे चेतना लॉन, छत्रपती संभाजीनगर रोड, नगर येथे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात भीमप्रेमी गीत गायक संगीत सितारे परिवार हे बहारदार भीम गीते सादर करणार आहेत.

या कार्यक्रमास भीमप्रेमींनी उपस्थित रहावे, असे आवाहन बौद्ध संस्कार संघाच्यावतीने भाऊसाहेब देठे यांनी केले आहे.

# गुल गुलशन गुलफाम

## सुहाना सफर...

राजसाहेबांच्या उपरोधाने पेटून उठलेला, निर्माता व्हायचं म्हणजे नेमकं काय करायचं हे माहित नसल्याने सैरभैर झालेला गुलशन, देवसाहेबांच्या मदतीने- गुल, गुलशन आणि गुलफाम कसा झाला ते आज पाहुयात.

देवसाहेबांनी, नवकेतन ची अख्खी फळी जोरदार कामाला लावली. त्रिमूर्ती प्रॉडक्शनच्या(गुलशन च बॅनर) सहाय्याला त्यांनी कलाकार, दिग्दर्शक, लेखक, एडिटर, कॅमेरामन आणि इतर तंत्रज्ञाना, गुलशन च्या दिमतीला एका रात्रीत उभे केले, जणुकाही देवसाहेबांच्या नवकेतन च होम प्रॉडक्शनच. कोणीही गुलशन कडे मानधनाची चौकशीही केली नाही. गुलशन खूपच नैतिकतेला धरून काम करत असे त्यामुळे योग्य ते मानधन मिळेलच अशी सगळ्यांची खात्रीच होती. नायक आणि दिग्दर्शक तेंव्हा सगळ्यात जास्त मानधन घेत असत, म्हणून गुलशन ने त्यांना, त्यांच्या व्यावसायिक मानधनापेक्षा जास्त मानधन द्यायचं ठरवलं. (नवकेतन चा,' हरे रामा हरे क्रिष्णा', याच चित्रपटासोबत नेपाळ ला चित्रित होतं होता)



हिंदी चित्रपटसृष्टी किंवा इतर ठिकाणी श्रेय लाटण्याची अहमहमिका अनेकदा सुरु असते. या चित्रपटाचा मात्र श्रेय घेण्याचा एक वेगळाच किस्सा आहे. चित्रपटाची कथा होती, के ए नारायण(हम पंछी एक डाल के(१९५७), ज्वेल थीफ(१९६७), रामपूर का लक्ष्मण(१९७२), व्हिक्टोरिया नंबर २०३(१९७२) इत्यादी) यांची, त्यांनी पटकथेमधे दिग्दर्शकाची खूप मदत केली. जेंव्हा दिग्दर्शक त्यांना, त्याचं श्रेय देतो असं म्हणाला तर नारायण म्हणाले,' कशाला? कथेचं श्रेय जास्त महत्वाचं, ते मिळालं, झालं!'. दिग्दर्शकाने स्वतःच नाव पटकथेला लावलं आणि गंमत म्हणजे पटकथेला फिल्मफेअर मिळालं. (बिचाऱ्या नारायण यांना पश्चाताप झाला असेल. असो) चित्रपटाचा क्लायमॅक्स त्याकाळी खूपच अनोखा होता. त्यानंतर त्याचे बरेच छापे हिंदी चित्रपटातून पाडले गेले.

आय एस जोहर यांनाही, सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. त्यांनी चित्रपटात ट्रिपल रोल साकारला. (गमतीची बाब म्हणजे त्याचवर्षी आलेल्या,' हमजोली' चित्रपटात, मेहमूद यांनीही ट्रिपल रोल साकारला, त्यानंतर मग दिलीप साहेब आणि अमिताभ यांनी अनुक्रमे,' बैराग,(१९७६) आणि,' महान', (१९८३) मधे ट्रिपल रोल केला होता.)

चित्रपट सुपर-डुपर हिट्ट ठरला, चित्रपटाच्या तिकिटाची किंमत, ५० पैसे, दीड रुपया आणि अडीच रुपये असताना चित्रपटाने प्रत्येक टेरेटरी मधे ५० लाख किंवा जास्त धंदा केला. मात्र चित्रपटाच्या, प्रदर्शनानंतर गुलशन आणि दिग्दर्शकात खूप वादंग झाले. गुलशन दिग्दर्शकाला धाकट्या भावाप्रमाणे मानत असे. पण त्याच्यामते, दिग्दर्शकाने त्याचा विश्वासघात केला. कसा ते पाहुयात पुढील लेखात.

बारीक-सारीक: अरे हो चित्रपटाच आधीचं नाव, ' दो रूप', असं दिग्दर्शकाने आणि इतर बरेच जणांनी ठरवलं होतं पण गुलशन ला ते पटलं नाही. त्याला हिंदी ऐवजी ट्रेंडी इंग्लिश नावं हवं होतं आणि त्याला ते राजसाहेबांच्या एका बिगबजेट ड्रीम चित्रपटावरून सुचलं.

गंमतीचा भाग म्हणजे, ज्वेल थीफ आणि आपल्या या चित्रपटाच्या ट्रायल मधे गुलशन चक्क घोरत होता. त्यामुळे पुढे अशी आख्यायिका झाली की, ज्या ज्या चित्रपटाच्या ट्रायल ला गुलशन झोपेल ते चित्रपट जबरी चालणार. पण गुलशन त्याच्या पुढच्या,' जोशीला',(१९७३) चित्रपटाच्या ट्रायल ला झोपला नाही आणि चित्रपट मात्र साफ झोपला.

**- देवाशिष शेडगे**

मो.८८०६०४४४८६




### राशीभविष्य

- **मेष** : आर्थिक व्यवहारात लाभ होईल. भेटी समाधान देतील. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल.
- **वृषभ** : अनपेक्षित घटना चिंता वाढवतील. मानसिक अस्वास्थ्य राहील. बोलण्यातून गैरसमज संभवतात.
- **मिथुन** : छोटा-मोठा प्रवास घडेल. जुनी येणी वसूल होतील. भागीदारी व्यवसायात उत्कर्ष होईल.
- **कर्क** : प्रेम प्रकरणात दिलासा मिळेल. वाहन, यंत्राचा वापर जपून करावा. प्रवास टाळायला हवा.
- **सिंह** : कौटुंबिक समस्या संभवतात. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी. आप्तस्वकीयांच्या भेटी होतील.
- **कन्या** : नवे करार मार्गी लागतील. अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवावं. प्रक्रिया उद्योगात यश लाभेल.
- **तूळ** : कामाचा उत्साह राहील. नव्या कल्पनांना वाव मिळेल. विवाहाच्या प्रयत्नात अडचणी येतील.
- **वृश्चिक** : स्थावर प्रश्नात लाभ होईल. कामासाठी धावपळ, दगदग होईल. नव्या ओळखींचा लाभ घ्यावा.
- **धनु** : कलागुणांना वाव मिळेल. वैवाहिक जीवनात अडचणी येतील. बेरोजगारांना समाधान लाभेल.
- **मकर** : खर्चाचं प्रमाण वाढलं तरी प्राप्ती तशीच राहील. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. चिंता नसावी.
- **कुंभ** : आमिषांना भुलू नका. व्यवसायात विचारानं राहणं हिताचं ठरेल. प्रकृतीच्या तक्रारी संभवतात.
- **मीन** : महत्त्वाच्या भेटी होतील. मित्र-नातलगांचं सहकार्य लाभेल. नव्या योजना सफल होतील.

### दिन विशेष

**१३ एप्रिल**

- **१९१९** : जालियनवाला बाग हत्याकांड, ३७९ लोक ठार, १२०० जखमी
- **१९७३** : प्रसिद्ध नट आणि चित्रपट दिग्दर्शक बलराज सहानी यांचे निधन.
- **२०१२** : आदर्श सोसायटीतील गैरव्यवहाराची चौकशी करणाऱ्या आयोगाने राज्य सरकारला अंतरिम अहवाल सादर केला.
- **२०१५** : 'लिव्ह इन' मधील जोडपे कायदेशीरदृष्ट्या विवाहित, सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय.
- **२०१६** : उत्तर भारत भूकंपाने हादरला.

### आरोग्यमंत्र — घ्या यकृताची काळजी

एका स्वस्थ व्यक्तीच्या शरीरात एक ते दीड किलो वजनाचं यकृत असतं. विशेष म्हणजे अधिकांश भाग क्षतिग्रस्त झाला तरी यकृताच्या कामात फारसे अडथळे येत नाहीत. पण याने काम करणंच थांबवलं तर जगणं अशक्य होतं. त्यामुळे यकृताची काळजी घ्यावी.

✻ मद्यपानाचं व्यसन यकृताच्या आरोग्यावर दूरगामी, गंभीर परिणाम करतं. एक वेळच्या अल्कोहोलच्या सेवनाने यकृताचं होणारं नुकसान भरुन काढण्यासाठी जवळपास दोन आठवड्याचा कालावधी लागतो.



✻ यकृत २० टक्के काम करत असलं तरी प्रत्यारोपणाची गरज भासत नाही. मात्र त्यापेक्षा अधिक क्षति पोहोचल्यास दुसरा उपाय रहात नाही. अल्कोहोलप्रमाणेच हेपिटायटिस वायरस इन्फेक्शन, फॅट्सचा अतिरेक आणि इतर हानिकारक द्रव्यांमुळेही यकृत क्षतिग्रस्त होऊ शकतं.

✻ भूक मंदावणं, सतत उलटीची भावना होणं, पोटात तीव्र वेदना जाणवणं, कमालीचा थकवा, पोटात पाणी होणं यासारख्या लक्षणांवरुन यकृत नादुरुस्त असल्याचं समजू शकतं.

✻ यकृत प्रत्यारोपणाची प्रक्रिया गुंतागुंतीची असली तरी वैद्यक शास्त्रातील प्रगतीमुळे यात फारसा धोका राहिलेला नाही. ब्रेनडेड व्यक्ती अथवा अगदी जवळच्या नातेवाईकाचं यकृत मिळवल्यास ही प्रक्रिया वेगाने पार पडते, मात्र यासंबंधीचे नियम क्लिष्ट आहेत हे लक्षात घ्यावं.

### महत्त्वपूर्ण काही... — मुलाखत देताना...

पहिल्यांदांच मुलाखत देताना घाबरून गेल्यासारखे होते. मुलाखत देताना अनेक गोष्टींचे भान ठेवावे लागते. कारकिर्दीची सुरूवात करण्याचा हा काळ अत्यंत हुशारीने हाताळावा लागतो. मुलाखतीच्या वेळी सर्वप्रथम देहबोलीकडे लक्ष असू द्यावे. हातवारे करून बोलणे, चेहऱ्यावर नको इतके हावभाव आणणे टाळावे. आपण एका उच्चपदस्थ व्यक्तीशी बोलत आहोत याचे भान राखावे. मोठ्या आवाजात बोलणे, शब्दांचा अवाजवी वापर टाळावा. नखे खाणे, पायावर पाय टाकून बसणे टाळावे. मुलाखतीला जाताना कार्यालय, तेथील ज्या पदासाठी अर्ज करत आहात त्याला साजेसा पोषाख असेल याची खबरदारी घ्यावी. मुलाखतीला गेल्यावर पोक काढून, अंग ढिले करून बसणे टाळावे. जमेल तेवढे हजरजबाबी रहावे. सकारात्मक विचार नवी उर्जा निर्माण करतो. चर्चात्मक परीक्षा असल्यास सतत विरोधात बोलणे टाळावे. महत्वाचे म्हणजे नजरेला नजर देऊन बोलावे. मुलाखतीला जाताना माध्यमिक-उच्च माध्यमिक शालांत परीक्षेचे, पदवीचे प्रमाणपत्र, अगोदर केलेल्या नोकरीच्या अनुभवाचे प्रमाणपत्र सोबत ठेवावे.

### सल्ला मोलाचा — कुकरमधील वैविध्य

स्वयंपाकघरातील महत्त्वाचे उपकरण म्हणजे कूकर. आतल्या झाकणाचा आणि बाहेरच्या झाकणाचा असे कुकरचे दोन प्रकार आहेत. हॉकिन्स, प्रेस्टिज, विनोद, बटरफ्लाय, एलिट, निर्लेप या कंपन्यांचे कुकर बाजारात उपलब्ध आहेत. निर्लेपचे कुकर हॉकिन्सच्या कुकरप्रमाणे आतल्या झाकणाचे आहेत. एलिटच्या कुकरमध्ये विथ कंटेनर आणि विदाऊट कंटेनर असे प्रकार आहेत. हॉकिन्समध्ये वीस लिटरपर्यंतचे कुकर आहेत. निर्लेपनं सॅटिलॉनमध्ये म्हणजेच काळ्या कोटिंगचे कुकरही उत्पादित केले आहेत. प्रेस्टिज कंपनीचा साडेसात लिटरचा कुकर घेतला तर त्याचेच झाकण प्रेस्टिजच्या पॅनलाही बसते. प्रेस्टिज आणि एलिट या कंपन्यांनी प्रेशर पॅनची निर्मिती केली आहे. त्यात भाज्यांना फोडणी देता येते. उसळी करता येतात. पुलाव, बिर्याणी तसेच मोदक, इडल्यादेखील करता येतात. केकही चवदार होतो. असे कुकर वापरण्यामुळे इंधन बचत होते. तुम्ही यात ऑईल फ्री भाज्याही करू शकता. अगदीच हवे असेल तर कमी तेलातही भाज्या यात करता येतात. विशेष म्हणजे यात भाज्या जळण्याचा धोका कमी असतो.

### पंचांग

**शनिवार, १३ एप्रिल २०२४**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
चैत्र शु. ५, नक्षत्र : मृगशीर्ष
चंद्रराशी : वृषभ , शोभन योग
सूर्योदय: ६.२५, सूर्यास्त: ६.५४

### फॉरवर्डस

**आपल्या माणसांना कधीही विसरता येत नाही. याचं समर्पक वर्णन करणारे हे शब्द खूप काही सांगून जातात.**

न बोलू. न लिखू तो ये मत समझना
कि भूल गए हम, खामोशियों ने भी
कुछ जिम्मेदारी ले रखी है।

### टेक्नो टॉक

मुलं मोठी झाल्यावर कशी दिसतील हे सांगणारं एक सॉफ्टवेअर अमेरिकन संशोधकांनी विकसित केलं आहे. या सॉफ्टवेअरमध्ये मुलांचा फोटो टाकताच काळाबरोबर त्यांच्या चेहऱ्यात काय बदल होतील हे या माध्यमातून आपल्यासमोर येईल. मुलं ८० वर्षांची होईपर्यंत कशी दिसतील याचे अंदाज या सॉफ्टवेअरमधून समोर येतात. युनिव्हर्सिटी ऑफ वॉशिंग्टनच्या कॉम्प्युटर आणि इंजिनिअरींग विभागाचे प्रोफेसर इरा केममाचेर यांच्या म्हणण्यानुसार फक्त मुलांच्या फोटोने काळाबरोबर त्यांच्या चेहऱ्यात काय बदल होतील याचे अंदाज बांधणं अवघड होतं.

### करिअरवाटा — सांगितिक कारकिर्दीसाठी...

संगीत आवडत नाही अशी व्यक्ती शोधून सापडणार नाही. त्यातल्या त्यात शास्त्रीय संगीत म्हणजे भारताची ओळख आहे. परदेशातही संगीताचे शास्त्रशुद्ध शिक्षण देणाऱ्या संस्था आहेत. लंडनचं ट्रिनिटी कॉलेजही असंच आहे. ही संस्था शास्त्रीय संगीताच्या अभ्यासासाठी प्रसिद्ध आहे. या संस्थेनं शास्त्रीय संगीताचे अभ्यासक्रम तयार करून विविध ग्रेडच्या परीक्षा घेण्याची चांगली परंपरा निर्माण केली आहे. आता त्याला संगीतात वापरल्या जाणाऱ्या विविध वाद्यांचीही जोड दिली असून त्यांचंही प्रशिक्षण देण्याची सोय आहे. या संस्थेनं विविध कलांचाही अंतर्भाव अभ्यासक्रमात केला आहे. काळाशी जुळवून घेत ट्रिनिटीनं काही वर्षांपूर्वी 'रॉक अँड पॉप म्युझिक'चाही अभ्यासक्रम सुरू केला आहे. भारतातल्या शास्त्रीय संगीताचा अभ्यासक्रम ब्रिटनच्या राजधानीत आणि ब्रिटीश संगीताचा अभ्यासक्रम भारताच्या राजधानीत सुरू करून ट्रिनिटीचा कलेच्या क्षेत्रात नवी एकात्मता निर्माण करण्याचा हेतू आहे. हा रॉक अँड पॉपचा अभ्यासक्रम दिल्लीच्या ट्रिनिटी कॉलेजमध्ये उपलब्ध आहे. या क्षेत्रात कारकिर्द करू इच्छिणाऱ्यांनी याचा लाभ घ्यायला हवा.



### खेचाखेची — कारण की...

कारकून : साहेब, तुम्ही ऑफिसमध्ये बॅचलर मुलांना का नोकरीला ठेवत नाही. फक्त लग्न झालेल्या पुरुषांनाच का नोकरी देता?

.
.
.
.


साहेब : कारण त्यांना बेइज्ञती सोसण्याची सवय असते आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे घरी जाण्याची घाई नसते.

### वेगळं काही

जगामध्ये अनेक रहस्यमय जागा असून त्या लोकांना आकर्षित करतात. त्यावर विश्वास ठेवणं अवघड जातं. पण, तरीही पर्यटक त्या ठिकाणी येऊन त्या जागांचा मनमुराद आनंद लुटतात. बेल्जियममध्येही अशीच एक रहस्यमय जागा आहे. हॉले फॉरेस्ट नावाने हे जंगल ओळखलं जातं. अन्य जंगलांमध्ये जमिनीवर हिरवळ पसरलेली दिसते. पण, या संपूर्ण जंगलाने आपल्या अंगावर निळ्या फुलांची चादर पांघरली आहे. वसंत ऋतूपासून उन्हाळ्यापर्यंत इथे निळी फुलं उमलतात. निळ्या रंगाप्रमाणेच येथे वांगी रंगाची फुलंही उमलतात. ही फुलं या जंगलात गेल्या ३०० ते ४०० वर्षांपासून फुलत असून ती पर्यटकांचं मन मोहून घेतात.

### लाईफस्टाईल — केसांच्या दुर्गंधीपासून सुटका

उन्हाळ्यात सतत येणारा घाम ही त्रासदायक बाब ठरते. केसांमध्येही मोठ्या प्रमाणात घाम येतो. हा घाम केसांच्या मुळाशी साठत असेल तर केसांनाही उग्र दर्प येऊ लागतो. अशा वेळी एखाद्या कार्यक्रमाला किंवा महत्त्वाच्या मिटींगला जाणं अवघड होऊन बसतं. मात्र, काही नैसर्गिक घटकांचा वापर करुन केसांची दुर्गंधी घालवता येते. कसं ते जाणून घेऊ...



✻ **लसणाचं तेल** – अर्धा कप खोबरेल तेल तीन-चार लसणाच्या पाकळ्या टाकून उकळावं. कोमट झाल्यावर त्यात कापसाचा बोळा बुडवावा आणि त्याने डोक्याला मसाज करावा. वीस मिनिटांनी धुवून टाकावं.

✻ **मध आणि दालचिनी** – पाव कप उकळत्या पाण्यात अर्धा चमचा दालचिनी पावडर मिसळून थोडा वेळ झाकून ठेवा. पाणी थंड झालं की चमचाभर मध मिसळा. हे मिश्रण ४५ मिनिटांपर्यंत डोक्याला लावून नंतर शॅम्पूने धुवून टाका.

✻ **ऑलिव्ह ऑईल** – या तेलामध्ये दुर्गंधी दूर करणारे गुणधर्म आहेत. त्यामुळे केस धुण्यापूर्वी ऑलिव्ह ऑईलचा मसाज गुणकारी ठरतो. यामुळे केसांचा दर्प नाहीसा होतो.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist.Ahmednagar, Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist Ahmednagar, Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प), जिल्हा-अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

## सुविचार

आपले लक्ष्य, साध्य विसरू नका. अन्यथा जे काही मिळाले तेवढ्यावरच संतुष्ट राहण्याची सवय लागेल. (संकलित)

## सामान्यज्ञान

फ्रान्सनंतर स्वीस एअरने १९३४ मध्ये व १९३८ मध्ये मलेशियन हवाई सुंदरीने आपली ड्युटी पार पाडली.

संकलन – अरविंद ब्राम्हणे

## उठाठेव

– विवेक मेहेत्रे



शेवटच्या क्षणी काँग्रेस पक्षाने त्यांचे तिकिट कापले... स्वतःकडून अप्रत्यक्षपणेही काँग्रेसच्या निशाणीचा प्रचार होऊ नये म्हणून त्यांनी हे असं......

### गजानन कीर्तीकरांचा घरचा आहेर; चंद्रशेखर बावनकुळेंचे प्रत्युत्तर

# विरोधकांची ईडी चौकशी भाजपाची नवी संस्कृती



**मुंबई, दि.१२–** शिवसेना शिंदे गटाचे उत्तर पश्चिम लोकसभेचे विद्यमान खासदार गजानन किर्तीकर यांनी गोरेगाव मधील महायुतीच्या मेळाव्यात बोलत असताना भाजपावर शरसंधान साधले. भाजपाने ४०० पार जाण्याऐवजी संपूर्ण संसदच ताब्यात घ्यावी, पण मित्रपक्ष आणि विरोधकांना अडचणीत आणू नये, असे विधान केले होते. या विधानातून त्यांनी अप्रत्यक्षपणे भाजपावर टीका केली. तसेच आपला मुलगा अमोल किर्तीकर याला ईडीकडून नाहक त्रास दिला जात असल्याचाही आरोप त्यांनी केला. किर्तीकर यांच्या आरोपाना भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही उत्तर दिले आहे.

गजानन किर्तीकर म्हणाले की, शिवसेनेत मला ५७ वर्षे झाली. पण मी कधी लबाडी किंवा कपट–करस्थान कधीच केले नाही. अमोल किर्तीकर विरोधात मी प्रचार करणार हे जाहीर केले होते. त्याप्रमाणे मी त्यांच्याविरोधात प्रचार करणार आहेच. पण अमोल किर्तीकर यांच्याविरोधात सुरू असलेल्या ईडी चौकशीतून काहीही निष्पन्न होणार नाही. खिचडी घोटाळ्यातून काहीही हाती लागणार नाही, हे ईडीचे अधिकारीही खासगीत मान्य करतात. भाजपाने यंदा ४०० पार असा नारा दिला आहे. त्यांनी ४०० जागांऐवजी संसदच ताब्यात घ्यावी, पण दुसऱ्या बाजूला विरोधकांचाही सन्मान ठेवावा, असे ते म्हणाले.

त्यावर बावनकुळे म्हणाले, की आमच्यापेक्षा काँग्रेसच्या काळात ईडीच्या सर्वाधिक कारवाया झाल्या होत्या. पी. चिदंबरम केंद्रीय गृहमंत्री असताना अशा अनेक कारवाया झाल्या होत्या. केंद्रीय यंत्रणाकडून होणारी कारवाई भाजपा करत नाही. प्राप्तिकर विभागाला एखाद्याच्या उत्पन्नात कमी–अधिक प्रमाण आढळले तर त्यावर चौकशी होते. महाविकास आघाडी सरकारच्या काळात आमच्याही चौकशा झालेल्या आहेत.

## पॅलेस्टाईनचा झेंडा फडकवला; गुन्हा दाखल

**समाचार/नगर-दि.१२**

शहरातील ईदगाह मैदानालगत पॅलेस्टाईनचा झेंडा फडकवल्यासंदर्भात अनोळखी व्यक्तीविरुध्द कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान रमजान ईदच्या निमित्ताने आयोजित सामूहिक नमाज पठणावेळी पॅलेस्टाईनच्या झेंड्याचे चिन्ह असलेल्या कागदी बिल्ल्यांचे वितरण करण्याचा प्रयत्न केला. हे बिल्ले पोलिसांनी जप्त केले.

ईदगाह मैदान कोठला भागात आहे. या मैदानाच्या संरक्षण भिंतीलगत विजेच्या खांबावर बुधवारी पॅलेस्टाईनचा झेंडा विनापरवाना लावण्यात आला होता. यासंदर्भात मनपा कर्मचारी मुजमील राजू पठाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, याबाबतची माहिती मिळाल्यानंतर शहर पोलिस उपअधीक्षक अमोल भारती, कोतवालीचे पोलिस निरीक्षक प्रताप दराडे आणि कोतवाली पोलिस ठाण्याच्या अंमलदारांनी घटनास्थळी धाव घेतली. महापालिकेला याबाबत माहिती देण्यात आली. तसेच महापालिकेला याबाबत फिर्याद देण्यास सांगण्यात आले. या घटनेचा पोलिस तपास करीत आहेत.

## निवडक

### जम्मू काश्मिरमध्ये लवकरच विधानसभा निवडणूक- मोदी

**नवी दिल्ली, दि. १२–** आगामी लोकसभा निवडणुकीचा जोरदार प्रचार सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज प्रचारासाठी उधमपूरला पोहोचले. याच दरम्यान मोदी म्हणाले की, जम्मू–काश्मीरला त्यांचा राज्याचा दर्जा परत मिळेल आणि केंद्रशासित प्रदेशात विधानसभा निवडणुका होतील, ही वेळ दूर नाही. भाजपाने उधमपूरमधून केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांना उमेदवारी दिली आहे.

कमकुवत काँग्रेस सरकारने शाहपूर कंडी धरण १० वर्षे प्रलंबित ठेवले. त्यामुळे जम्मूतील गावे कोरडी पडली होती. काँग्रेसच्या काळात रावीतून बाहेर पडणारे आमच्या हक्काचे पाणी पाकिस्तानात जात होते. जेव्हा लोकांना त्यांचे वास्तव कळले, तेव्हा जम्मू–काश्मीरमध्ये भ्रमाचे मायाजाळ चालणार नाही, असे ते म्हणाले.

## ग्रीन व्हॅली स्कूलमध्ये गुढीपाडवा, उगुडी, चेटीचंद उत्साहात

**समाचार/नगर-दि.१२**

मुलांना भारतीय संस्कृती आणि परंपरेची ओळख करून देणे हे प्री स्कूलचे कर्तव्य आहे. हे लक्षात घेऊन द ग्रीन व्हॅली प्रीस्कूलमध्ये गुढीपाडवा साजरा करण्यात आला. संस्थापक आणि मुख्याध्यापिका उमंग नंदा म्हणाल्या, की गुढीपाडवा हा चैत्र महिन्याच्या पहिल्या दिवशी साजरा केला जातो.

हे नवीन मराठी वर्ष म्हणून साजरे केले जाते. गुढीपाडव्यालाही ऐतिहासिक महत्त्व आहे. महाराष्ट्रात गुढीपाडवा साजरा केला जातो, त्याचप्रमाणे आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि तामिळनाडू सारख्या दक्षिणेकडील राज्यांमध्ये उगुडी साजरी केली जाते. चैत्र महिन्याच्या पहिल्या दिवशी नवीन वर्षाची सुरुवात म्हणूनही हा सण साजरा केला जातो. हे भारतीय संस्कृतीच्या विविधतेतील अखंडतेचे सौंदर्य आहे.मुलांना संत झुलेलाल यांच्याविषयी देखील माहिती देण्यात आली.यावेळी शिक्षकांनी महाराष्ट्रीयन पगडी परिधान केली होती.

या सर्व सणांचे महत्त्व सांगणारी गीते शिक्षकांनी गायली. या सणांशी संबंधित सुंदर कलाकुसरीच्या कल्पनांनी शाळा सजवण्यात आली होती. कागदावर गुढी बनवल्यानंतर मुलांनी आनंद लुटला आणि अभिमानाने दाखवला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भावना महाले, करिश्मा गांधी, वर्षा कुलथे, आकांक्षा बोरूडे, हर्षदा त्रिभुवन यांनी परिश्रम घेतले.

### श्वसन प्रणालीमध्ये प्रभावी उपचार पद्धतीसाठी पुरस्कार

## डॉ. दीपक अमेरिकन संशोधन संस्थेच्या पुरस्काराने सन्मानित

**समाचार/नगर-दि.१२**




अमेरिकेतील व इतर देशातील आंतरराष्ट्रीय उत्कृष्ट संशोधन संस्था यांच्यावतीने श्वसन प्रणालीमध्ये एआरडीएसवर उपचारासाठी तसेच स्वाईन फ्लूवर प्रभावी उपचार यासाठी प्रतिथयश डॉ.दीपक एस.एस. यांना उत्कृष्ट संशोधन पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला.

तामिळनाडू येथील तिरुचिरापल्ली येथे अमेरिका येथील आंतरराष्ट्रीय संशोधन संस्था व इतर देशातील संशोधन संस्था यांच्यावतीने उत्कृष्ट संशोधन करून श्वसन प्रणालीवर प्रभावी उपचार केल्यामुळे अनेक रुग्णांना त्याचा लाभ होऊन ते पूर्णपणे बरे झाले. याची नोंद घेऊन उत्कृष्ट संशोधन पुरस्कार डॉ. दीपक यांना प्रदान करण्यात आला. यावेळी निवड समितीचे सदस्य डॉ. फारिहा (नेदरलँड्स), डॉ. गलिसिए (मेक्सिको), डॉ. त्यिांक्सिओ (चीन), डॉ. जे. एस. कुमारी (श्रीलंका), डॉ. कॅरिअस (मोझांबिक), प्रा. शिझयुव (जपान) यांच्या उपस्थित व त्यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी १७ विविध देशांचे डॉक्टर्स मोठ्या संख्येने उपस्थित होते.जगातील पहिल्यांदा रेणूचा वापर करून साईदीप हॉस्पिटलचे चेअरमन डॉ. दीपक यांनी एआरडीएसवर प्रभावी उपचार करून रुग्णांना जीवनदान दिले याची नोंद घेऊन अमेरिका येथील जागतिक संशोधन संस्थेने हा पुरस्कार प्रदान केला. एआरडीएस या श्वसन विकारावर उपचार केल्याने अनेक रुग्ण या संशोधीत उपचार पद्धतीमुळे बरे झाले. डॉ.दीपक यांनी यावेळी नेहमीची उपचार पद्धतीला संशोधित जोड दिल्यास उपचार पद्धती अधिक प्रभावी पणे काम करते. यामुळे रुग्णाला आराम मिळण्यासाठी सुरवात होते व जास्त दिवस हॉस्पिटलमध्ये राहावे लागत नाही. करोना काळात या उत्कृष्ट उपचार पद्धतीमुळे अनेकांचे जीव वाचवता आले असे सांगून पुरस्कार प्रदान केल्याबाबत संस्थेचे आभार मानले.

## पाच वर्षातील विकास कामे लोकांपर्यंत पोहोचवा- खा. विखे



**समाचार/नगर-दि.१२**

पाच वर्षात कार्यकाळात मतदारसंघात केलेली विकासकामे लोकांपर्यंत पोहचवावी, असे आवाहन खा. डॉ. सुजय विखे यांनी श्रीगोंदा येथील सभेत बोलताना केले.

खा.विखे यांनी नगर दक्षिण लोकसभा मतदार संघात प्रचार सभांचा धडाका सुरू केला आहे. निवडणुकीपूर्वीच त्यांनी थेट लोकांच्या गाठीभेटी सुरू केल्या होत्या. श्रीगोंदा तालुक्यातील पारगाव येथे कार्यकर्त्यांचा मेळावा पार पडला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, विरोधकांच्या टिकेकडे दुर्लक्ष करुन केवळ मागील पाच वर्षात केलेल्या विकास कामांची माहिती लोकांना सांगावी. यावेळी भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमसिंह पाचपुते उपस्थित होते. खा. विखे म्हणाले की, स्वच्छ भारत मिशन आणि जल जीवन मिशन सारख्या उपक्रमांमुळे देशभरातील स्वच्छता सुधारली आहे. प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री जनधन योजना आणि नवीन शिक्षण धोरणामुळे समाजातील प्रत्येक घटकविकासाच्या मुख्य प्रवाहात आला आहे. मोदी यांच्या नेतृत्वात देशाचा विकास झाला असून शेतकरी, गोरगरीब, महिला आणि तरूणांच्या जीवनात अमुलाग्र बदल झाला आहे, असे खा. सुजय विखे यांनी सांगितले.

## 'लिटिल फ्लॉवर'च्या चिमुरड्यांनी गिरवले व्यवहार ज्ञानाचे धडे



**समाचार/नगर-दि.१२**

लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या सारसनगर शाखेतील एलकेजी, युकेजीच्या चिमुरड्यांनी आनंद फुड मॉलला भेट देऊन स्वतः मनपसंत खरेदीचा आनंद लुटला. घरून मिळालेले पैसे घेऊन मुलं फूड मॉलमध्ये आले. स्वतःच्या आवडीचा खाऊ स्वतःच विकत घेणे, बिलिंग करणे, उरलेले पैसे परत घेणे असे सगळे व्यवहार करताना त्यांचे चेहरे फुलले होते. एरव्ही वडीलधारी मंडळींसोबत दुकानात खरेदी करायला जाणाऱ्या मुलांनी स्वतः खरेदी करून व्यवहार ज्ञानाचे धडे गिरवले. ही खरेदी करताना मुलांनी आपल्या आईसाठी तर कोणी घरातील भावंडे, आजी आजोबांसाठीही खास पदार्थ घेतले.

लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या संचालिका मनिषा बोगावत, विशाल बोगावत यांच्या संकल्पनेतून राबवण्यात आलेला हा अभिनव उपक्रम मुलांसाठी वेगळा अनुभव ठरला. प्री स्कूलच्या मुलांना खेळ, अभ्यास याबरोबरच पैशाचे महत्त्व कळावे, शिस्त लागावी आणि व्यवहार ज्ञानाचे प्राथमिक धडेही मिळावेत या उद्देशाने आनंद फुड मॉलला भेट दिल्याचे बोगावत यांनी सांगितले. लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या इमारत कंपनी शाखेतील विद्यार्थी दि. १५ एप्रिल रोजी केडगाव इंडस्ट्रीयल इस्टेट येथील आनंद बोगावत यांच्या आईस्क्रीम फॅक्टरीला भेट देणार आहेत,तर भुतकरनगर शाखेतील विद्यार्थी रिलायन्स शॉपीला भेट देऊन नवीन ज्ञान मिळवणार आहेत. प्री स्कूलमधील विद्यार्थ्यांसाठी दि. २६ एप्रिल ते २ मे या कालावधीत खास उन्हाळी शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे.

**समाचार**

**वाचकांना नम्र सूचना**

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.



**हनुमान चालिसा**

**मंगल भक्त सेवा मंडळ**

शुक्रवार, दि. ११ एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
– स्थळ –
**दोस्ती मित्र मंडळ**
फुलार गल्ली, माळीवाडा, ऋषीककेश कॉर्नर, **अहमदनगर**

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडल**

शुक्रवार, दि. ११ एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
– स्थळ –
**श्री जय हनुमान युवा प्रतिष्ठान**
कराचीवाला नगर, महेश थिएटर जवळ **अहमदनगर**

**श्री दक्षिण मुखी हनुमान सत्संग मंडळ**

शुक्रवार, दि. ११ एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
– स्थळ –
**महात्मा ज्योतिबा फुले युवा प्रतिष्ठान**
फुलसौदर चाळ, बुरुडगाव रोड,
**किशोर फुलसौंदर**

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट)**

शुक्रवार, दि. ११ एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
– स्थळ –
**श्री जय हनुमान युवा प्रतिष्ठान**
कराचीवाला नगर, महेश थिएटर जवळ **अहमदनगर**

## मुंबई शेअर भाव

**सुट्ट्यांचा परिणाम सेन्सेक्समध्ये ६०० ने घट**

(शेअर सबब्रोकर)
अशोक पटवा
फोन–२४५२५२७, २४५२२६४
मोबा. ८७८८६९९९६१

**दिनांक १२-४-२०२४**
**दुपारी २ पर्यंतचे भाव**

| | |
|---|---|
| आजचा इंडेक्स : | ७४३८८ |
| एसीसी | २४८६–८७ |
| एशियन पेंट | २८६१–६२ |
| बजाज ऑटो लि. | ९०६१–६२ |
| बलराम फूड चिनी | ३७९–८० |
| भारत फोर्ज | ११७०–७१ |
| क्रॉम्प्टन | २९६–९७ |
| डीएलएफ | ९१२–१३ |
| डॉ. रेड्डीज् लॅब | ६१२३–२४ |
| ग्रॅफाईट इंडिया | ६६०–६१ |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | २२४०–४१ |
| आयटीसी लि. | ४३१–३२ |
| एल ॲण्ड टी लि. | ३७१०–११ |
| रिलायन्स इंड. | २९५३–५४ |
| एसबीआय | ७७१–७२ |
| टाटा मोटर्स | १०२१–२२ |
| टाटा स्टील | १६४–६५ |
| टीसीएस | ३९७८–७९ |
| लक्ष्मी ऑरगॅनिक | २५९–६० |
| सुवेन फार्मा | ६२६–२७ |

## किराणा दुकानाचे शटर तोडून ९० हजाराची रोकड चोरीस

**समाचार/नगर-दि.१२**

किराणा दुकानाचे शटर तोडून ९० हजार रूपयांची रोकड चोरून नेल्याची घटना आगरकर मळ्यातील शिवनेरी मार्ग परिसरात घडली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनिल बाबुलाल कटारिया (वय ५४) यांनी फिर्याद दिली आहे. कटारीया यांचे आगरकर मळ्यातील घराच्या समोरील बाजूला शांती डिपार्टमेंटल अॅण्ड जनरल स्टोअर नावाचे किराणा दुकान आहे. त्यांनी मंगळवारी (दि. ९) सकाळी सहा वाजता दुकान उघडले होते. दिवसभराचे काम करून आठवडाभराचे जमलेले ९० हजार रूपयांची रोकड त्यांनी कॅश काऊंटरमध्ये ठेऊन ड्रॉवर लॉक केले होते. रात्री ११ वाजता दुकान बंद केले. दुसऱ्या दिवशी बुधवारी (दि. १०) सकाळी सहा वाजता ते दुकानात गेले असता, त्यांना दुकानात चोरी झाल्याचे दिसले.

### दरवाढीने सगळे रेकॉर्ड तोडले

# सोने, चांदीने बिगूल वाजवला!



**नवी दिल्ली, दि. १०–** जागतिक बाजारापासून भारतीय सराफ बाजारात सोने गुंतवणूकदारांची पहिली पसंत बनली आहे. वाढते भू–राजकीय तणाव आणि व्याजदरात कपात होण्याची प्रतीक्षा आणखी वाढल्यामुळे सराफ बाजारात ऐतिहासिक दरवाढ होत आहे. या आठवड्यात सोने आणि चांदीचे वायदे तेजी दिसत असून पूर्वीचा विक्रम मोडीत काढून दोन्हींनी नवे उच्चांक गाठले आहे.

एप्रिलमध्ये सोन्या–चांदीच्या किमती सातत्याने वाढत असताना आज (गुरुवारी) सकाळपासून सोन्याची किंमत ७५० रुपयांनी वाढली आणि गेल्या वर्षी ६३ हजार रुपये प्रति १० ग्रॅम असलेल्या सोन्याने आता ७२,००० रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. सोन्याच्या फ्युचर्स किमतीने ७२ हजार रुपयांची तर चांदीच्या फ्युचर्स किमतीने ८४ हजार रुपयांची पातळी ओलांडली आहे. तसेच आंतरराष्ट्रीय बाजारातही भविष्यात सोन्या–चांदीच्या भावात वाढ होण्याची शक्यता असून सोन्याच्या फ्युचर्सने २,४०० डॉलर प्रति औंसच्या पुढे झेप घेत उच्चांकी पातळी गाठली.

दुसरीकडे, जागतिक बाजारातही सोने आणि चांदीच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. कॉमेक्सवर सोन्याची किंमत प्रथमच प्रति औंस २,४०० डॉलरवर पोहोचली असून अमेरिकेतील मॅक्रो इकॉनॉमिक डेटामुळे सोन्याला पाठिंबा मिळत आहे. त्याचवेळी, चांदीमध्येही मोठी वाढ दिसून आली आणि कॉमेक्सवर चांदी २९ डॉलर प्रति औंसवर पोहोचली आहे.सुरक्षित गुंतवणुकीची वाढती मागणी, तसेच मध्यपूर्वेतील तणाव आणखी वाढण्याच्या भीतीमुळे सोन्याची किंमत दिवसेंदिवस नवनवीन उच्चांक नोंदवत आहे. याशिवाय चीन, भारत, तुर्की आणि इतर जगभरातील केंद्रीय बँका सातत्याने सोने खरेदी करत असल्यामुळेही मौल्यवान धातू महागले आहे. तसेच यूएस उत्पादक किंमत डेटा वाढल्यामुळे व्याजदर कपातीची शक्यता वर्तवली गेली आहे.

# आमच्या आधारवड...

वटवृक्षाची शीतल छाया असल्यावर प्रत्येकाला त्या सावलीत आनंददायी जीवनाची अनुभूती येते. घरातील ज्येष्ठ मंडळी अशीच कुटुंबातील सदस्यांसाठी आधारवड असतात. आमच्या बोरा परिवारासाठी लिलाबाई वसंतलाल गुगळे म्हणजेच आमच्या ताईभोजी या हक्काचा आधारवड होत्या. दि.३ एप्रिल २०२४ रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी त्यांनी देहलोकाचा निरोप घेतला. आमच्या संपूर्ण परिवारासाठी ताईभोजींचे जाणं खूप वेदनादायी आहे. त्यांच्या असंख्य गोड आठवणी मनातून जात नाहीत. त्यांनी लावलेली माया, आम्हा सर्वांवर केलेले निर्व्याज प्रेम आणि त्यांचे आशीर्वाद कायम आमच्याबरोबर राहतील.

माझ्या आत्या म्हणजे ताईभोजी या आमच्या बोरा परिवारातील सर्वात मोठ्या होत्या. मिरजगाव येथील आमचे बोरा कुटुंब सर्वसामान्य कुटुंब. याच परिवारात चार बहिणी व तीन भाऊ यांच्यात ताईभोजी सर्वात थोरल्या होत्या. मोठे आणि एकत्रित कुटुंब असल्याने लहानपणापासूनच त्यांना सर्वांना सोबत घेऊन चालण्याचे बाळकडू मिळाले. पुढे त्यांचा विवाह जामखेड येथील वसंतलाल गुगळे यांच्याशी झाला. गुगळे परिवारही मोठाच आहे. वसंतलाल गुगळे कुटुंबासह व्यवसायानिमित्त पुढे पाटोदा (बीड) येथे वास्तव्यास गेले. ताईभोजींना एक मुलगा व दोन मुली असा परिवार. ताईभोजींनी गुगळे परिवाराबरोबरच माहेरच्या बोरा परिवाराकडेही तितकेच लक्ष दिले. मला स्वत:ला त्यांचा लहानपणापासून खूप लळा होता. त्यांच्या सहवासात राहणे मला खूप आवडायचे. मला आठवते मी ५ वर्षांचा होतो तेव्हा मी पाटोद्याला त्यांच्या घरी असताना पहिल्या मजल्यावरून खाली पडलो. ताईभोजी माझी अवस्था पाहून रडायला लागल्या. रडतरडतच त्यांनी मला हातात घेतलं आणि हॉस्पिटलमध्ये नेले. मी पूर्ण बरा होईपर्यंत त्यांनी माझी आईच्या मायेने काळजी घेतली. पुढे माझे शिक्षण चालू असताना त्या कायम माझी चौकशी करायच्या. मी डॉक्टर झाल्यावर त्यांना खूप आनंद झाला. प्रत्येक रूग्णाला चांगली सेवा दे, रूग्णांना वेदनामुक्त कर असे त्या आवर्जून सांगायच्या. त्यांच्या घरी आलेला कोणताही पाहुणा कधीही न जेवता परत गेला नाही. त्यांना स्वत:ला पाहुण्यांचे आदरातिथ्य करताना खूप आनंद व्हायचा.

बोरा परिवारासह सगळ्याच नातेवाईकांच्या प्रत्येक कार्यात त्या आवर्जून उपस्थित रहायच्या. त्या आल्या म्हणजे प्रत्येकाला मनातून आनंद व्हायचा. ताईभोजींना भेटल्यावर प्रत्येकाला नवी ऊर्जा मिळायची. त्या स्वत: अतिशय धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्यांनी आमच्यावर तसेच आमच्या पुढच्या पिढीवरही धार्मिकतेचे, चांगल्या विचारांचे संस्कार रूजवले. त्यामुळे आम्हाला जीवनात खूप लाभ झाला. त्यांच्या विषयी कितीही लिहिले तरी ते कमीच आहे. इतके प्रेम व आपुलकी त्यांनी संपर्कात



आलेल्या प्रत्येकाला दिली. आज त्या आमच्यात नाही पण त्यांच्या आठवणींचा सुगंध आमच्या आयुष्यात कायम दरवळत राहिल. हे विधात्या पुरे पुरे रे दुष्ट खेळ हा सारा, आकाशातून पुन्हा निखळला एक हासरा तारा. ताईभोजी, तुमचे आमच्या हृदयातील स्थान कायम राहिल.तुमचा हसरा चेहरा तुमचा मनाचा तो भोळेपणा नाही. दुखावलेस तुम्ही कधी कोणाला नाही, अचानक येते खूप तुमची आठवण परत या तुम्ही हीच अपेक्षा.

ताईभोजी तुमच्या पुण्य आत्म्यास शांती लाभो.

**– डॉ.सचिन बोरा** (अहमदनगर)

# फुले जयंती कार्यक्रमात पाणी बचतीचा संदेश



**समाचार/नगर-दि. १२**

नगर तालुक्यातील नेप्ती येथील संत सावता महाराज मंदिरात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद व ग्रामस्थाच्यावतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी पाणी बचतीचा व मतदान जागृतीचा संदेश देण्यात आला .

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे शाखाध्यक्ष शाहूराजे होले यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच नेप्ती ग्रामपंचायत मध्ये महात्मा फुले जयंती साजरी करण्यात आली. उपसरपंच दादू चौगुले यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी पंचायत समिती सदस्य देवा होले, समता परिषदेचे नगर तालुका अध्यक्ष रामदास फुले ,माजी सरपंच अंबादास पुंड, संजय जपकर, सुधाकर कदम ,उपसरपंच दादू चौगुले, जालिंदर शिंदे, पोलीस पाटील अरुण होले, प्रा. एकनाथ होले प्रा. भाऊसाहेब पुंड, भानुदास फुले ,ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ पुंड, गोरख फुले, बाळनाथ पुंड, परिसरातील समता सैनिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# ॲड.फारूख शेख यांचा सत्कार

**समाचार/नगर-दि.१२**

कर्मयोगी प्रतिष्ठानचे सदस्य ॲड.फारुख शेख यांना भारत सरकार नोटरी पब्लिक पद मिळाल्याबद्दल त्यांचा कर्मयोगी प्रतिष्ठानतर्फे सत्कार करण्यात आला. ॲड.शेख यांचं शिक्षण अहमदनगर महाविद्यालय आणि सीएसआरडी येथे एम.एस.डब्लू. झाले. नंतर त्यांनी कायद्याचा अभ्यासक्रम पूर्ण केला. माजी नगरसेवक आसिफ सुलतान यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी त्यांना डॉ. रिझवान अहमद यांनी शुभेच्छा देऊन,समाज प्रबोधना करीता सतत कार्यरत राहवे असे सूचित केले.कार्यक्रमास समीरखान,नफिस चुडीवाले,अजीम जहागीरदार,शफीभाई आणि रफिक मुन्शी हजर होते.

# निमगाव वाघात धार्मिक एकतेचे दर्शन

**समाचार/नगर-दि.१२**

निमगाव वाघा (ता. नगर) येथे रमजान ईद उत्साहात साजरी करण्यात आली. गावातील मशिदीमध्ये मुस्लिम समाज बांधवांनी सामुदायिक नमाज पठण करुन, गावाच्या सुख, समृध्दी व शांततेसाठी प्रार्थना केली. नमाजनंतर मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देण्यासाठी हिंदू बांधव मशिदमध्ये आर्वजून उपस्थित होते. हिंदू-मुस्लिम ग्रामस्थांनी एकमेकांना आलींगण देत ईदच्या शुभेच्छा दिल्या. यातून गावातील हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन घडले.



गावाच्या मशिदीमध्ये मौलाना आतिफ शेख यांच्या मार्गदर्शनाखाली नमाज पठण करण्यात आले. यावेळी उद्योजक दिलावर शेख, कादर शेख, ग्रामपंचायत सदस्य तथा डोंगरे संस्थेचे अध्यक्ष नाना डोंगरे, उस्मान शेख, रज्जाक शेख, दिलावर शेख, राजू शेख, आदम शेख, अहमद सय्यद, बख्तार सय्यद, बन्सी शेख, नवाब शेख, सलिम शेख, शब्बीर शेख, नासिर शेख, मोसीम शेख, आबिद शेख, गुड्डू शेख, अन्सार शेख, नवाझ सय्यद, पोलीस नाईक खंडेराव शिंदे, पै. संदिप डोंगरे आदींसह गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संगीतमय चित्रपट संगीत मानापमानचे पहिले पोस्टर आऊट




## सिनेरंग

जिओ स्टुडिओज आणि सुबोध भावे यांचा बहुप्रतिक्षित संगीतमय चित्रपट ''संगीत मानापमान'' चे पहिले पोस्टर गुढीपाडव्याचे औचित्य साधून प्रदर्शित करण्यात आले आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी हा चित्रपट यंदाच्या दिवाळीत म्हणजेच १ नोव्हेंबर रोजी प्रदर्शित होणार असल्याची घोषणा निर्मात्यांनी करताच प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली होती. या पोस्टरमध्ये सुबोध भावेंचा चित्रपटातील एक वेगळा लूक आणि पेहराव पाहता या चित्रपटाची भव्यता झळकून येत आहे.

या चित्रपटाचे दिग्दर्शन आणि प्रमुख भूमिका सुबोध भावे करणार असून, 'कट्यार काळजात घुसली' तसंच आणि डॉ. काशिनाथ घाणेकर या चित्रपटाची संपूर्ण टीम ह्या चित्रपटाच्या निमित्ताने पुन्हा एकदा एकत्र येत आहे आणि त्याचबरोबर मुख्य म्हणजे प्रसिध्द संगीतकार शंकर-एहसान-लॉय यांचे संगीत या चित्रपटासाठी असणार आहे. जिओ स्टुडिओज प्रस्तुत, ज्योती देशपांडे निर्मित, सुबोध भावे दिग्दर्शित आणि अभिनित, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्या अजरामर कलाकृतीवरून प्रेरित, ''संगीत मानापमान'' हा संगीतमय चित्रपट १ नोव्हेंबर २०२४ रोजी महाराष्ट्रातील सर्व चित्रपटगृहात प्रदर्शनास सज्ज होणार आहे.

# नवोन्मेषाचा आनंद घेऊन रंगला 'चिरायू'



'चैत्र शुद्ध प्रतिपदा' म्हणजेच गुढीपाडवा' उत्साहाने आणि उमेदीने साजरा करण्याची आपली परंपरा आहे. मराठी मनोरंजनसृष्टीही त्याला अपवाद नाही. नवनवे संकल्प आणि कार्य-प्रकल्पांसोबत मनोरजंनाची गुढी उभारत मराठी नववर्षाचं स्वागत 'चिरायू'तर्फे दरवर्षी नववर्षाच्या पूर्वसंध्येला दणक्यात साजरं केलं जातं. यंदाही गुढीपाडव्याच्या दोन दिवस आधी 'शेलार मामा फाऊंडेशन' आणि 'प्लॅनेट मराठी'च्या वतीने नववर्षाचं स्वागत जल्लोषात करण्यात आलं. 'चिरायू २०२४' साठी अवघं मराठी कलाविश्व एकवटलं होतं.

'शेलार मामा फाऊंडेशन' आणि 'प्लॅनेट मराठी'च्या वतीने आयोजित चिरायू २०२४' चे वैशिष्ट्य म्हणजे नवोन्मेषाच्या आनंदासोबतच पडद्यामागे राबणाऱ्या कलाकर्मींची दखल चिरायू' च्या मंचावर आवर्जून घेतली गेली. कलेच्या क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या सतीश लिंगाप्पा खवतोडे (कपडेपट), देविदास दरवेशी (नेपथ्य), डॉ. खुशाले (रुग्णसेवा), रेखा सावंत (केशभूषा) यांचा विशेष सत्कार यावेळी करण्यात आला. यंदाच्या या सोहळ्यात रील स्टार्स रोहित मावळे (फूड ब्लॉगर), आरजे प्रणित (स्टंड अप कॉमेडी), रोहन पाटकर (वाईल्ड लाईफ फोटोग्राफी), वैष्णवी नाईक (फॅशन ॲड लाईफस्टाईल), सुमन धामणे आजी (खाद्यपदार्थ/ फूड) यांचाही गौरव करण्यात आला. श्रीरंग चॅरिटेबल ट्रस्ट' च्या सायली, रुद्र, हंसिका या लहानग्यांनी सुरेख गुढ्यांची निर्मिती केल्याबद्दल त्यांचं खास कौतुक चिरायू' च्या मंचावर करण्यात आलं.

## शब्दखेळ – १४८


खाली दिलेल्या चौकोनात बॉलिवूड मधील १० विनोदी कलाकार लपलेले आहेत. शोधा पाहू.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | अ | क्या | जॉ | नी | लि | व | र |
| गा | स | रा | ज | पा | ल | ग | प |
| ता | रा | बा | रं | डू | ज | रे | के |
| का | नी | णी | धु | र | ग | ज | श्तो |
| द | ब | द | मा | क | दी | से | मु |
| र | क | मु | ळ | ना | प | ग | ख |
| खा | जो | ह | गी | ट | त्र | च | र्जी |
| न | द | मे | भ | ग | वा | न | का |

## शब्दखेळ – १४७ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पा | चं | द्र | मु | खी | श | हा | सं |
| नि | झा | ळ | गां | व | ना | प | भा |
| प | डा | बु | धी | या | ग | र | जी |
| त | झ | ल | गी | र | के | भ | र |
| ढे | ड | ढा | ता | पु | श | णी | क्रां |
| पां | ती | णा | डे | ग | र | पु | ती |
| गि | क | ला | ल | चौ | क | र | सू |
| रा | म | हा | ना | य | क | री | र्य |

# 'मनी माफिया' सीझन ३ चा प्रीमियर डिस्कव्हरी चॅनलवर




## टेलीनामा

डिस्कव्हरी चॅनल ''मनी माफिया'' सीझन ३ च्या अत्यंत अपेक्षित प्रीमियरसाठी सज्ज होत असताना संघटित गुन्हेगारीच्या खोलात आणखी एक रोमांचक शोध घेणार आहे. डिस्कव्हरी वाहिनी वरील त्याच्या मागील सीझनच्या यशानंतर, ही आकर्षक शोध दस्तऐवज – मालिका ७ एप्रिल, २०२४ पासून डिस्कव्हरी वाहिनीवर प्रीमियरसाठी सज्ज आहे, जी प्रेक्षकांना मुंबईतील कुख्यात गुन्हेगारी सिंडिकेटच्या अंतर्गत कामकाजाची अभूतपूर्व झलक देणार आहे. सीझन ३ मध्ये, ''पे-अप ऑर एल्स'' हा पहिला भाग व्यापारी, पोलिस आणि माफिया यांच्यातील खंडणीचा संबंध उघड करतो. ''गोल्ड ब्लडेड'' हा दुसरा भाग, सोन्याच्या तस्करीच्या इतिहासात १९६० पासून आजपर्यंत वापरलेल्या रणनीती आणि १९९३ च्या बॉम्बस्फोटांदरम्यान वापरलेले मार्ग यांचा समावेश आहे. तिसरा भाग ''द ठग्स ऑफ ड्रग्स'' मुंबईत ''म्याव-म्याव'' या ड्रगच्या वाढीचे परीक्षण करतो, व्यसनाधीनतेकडून पेडलरकडे होणारा बदल आणि अधिकाऱ्यांशी होणारा संघर्ष दाखवतो. क्लीनिंग डर्टी मनी हा शेवटचा भाग हिरा व्यापार, बँका, णझख आणि क्रिप्टोकरन्सी आणि भारतीय राजकारणाशी असलेल्या संबंधांद्वारे मनी लॉंड्रिंगवर प्रकाश टाकतो. ही मालिका डिस्कवरी वरील सर्वोच्च रेट केलेल्या शोमध्ये आहे आणि या मालिकेने यापूर्वी ओळख चोरी, क्रिप्टोकरन्सी कॉन्स, केतन पारेख आणि द 2003 द्वारे स्टॉक मार्केट मॅनिप्युलेशन स्कॅम या सर्व स्पेक्ट्रममध्ये घोटाळे प्रदर्शित केले आहेत. तेव्हा ७ एप्रिल पासून दर रविवारी रात्री १० वाजता डिस्कव्हरी वाहिनीवर चार भागांची दस्तऐवज मालिका प्रसारित होईल, ती नक्की पहा.

लोकरंजन

संकलन-संयोजन
सुबोध रणशेवरे
subodh.ranshevre rediffmail.com

## गायिका जावळे यांच्या गीतांनी वातावरण भीममय

# भीम उत्सवाचे शानदार उद्घाटन

**समाचार/नगर-दि.८**

क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सप्ता निमित्त दिल्लीगेट येथील नीलक्रांती चौक येथे निल क्रांती मित्र मंडळाच्या वतीने महाराष्ट्रातील प्रसिद्ध गायिका सुषमा जावळे यांच्या भीम बुद्ध गीतांचा कार्यक्रम जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला.

महापालिकेचे आयुक्त डॉ. पंकज जावळे व फुले शाहू आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते अशोक गायकवाड यांच्या हस्ते भीम उत्सवाचे उद्घाटन करण्यात आले त्यानंतर गायिका सुषमा जावळे यांच्या माझ्या भिमानं सोन्याने भरली ओटी, भीमराज कि बेटी मै तो जय भीम वाली हु यासारख्या गाण्यांमुळे सर्व वातावरण भीममय झाले होते.

यावेळी माजी नगरसेवक अजय साळवे, प्रा. जयंत गायकवाड, प्रा. भीमराव पगारे, महेश भोसले, सुनील साळवे, ज्येष्ठ मार्गदर्शक प्रकाश साळवे, किशोर साळवे, विनाताई कांबळे, अनुराधा साळवे, भगवान साळवे, शरद जाधव, विलास साठे, सुमेध गायकवाड, बाबासाहेब विधाते, नितीन कसबेकर, सतीशकुमार चाबुकस्वार, सुशांत म्हस्के, बौद्धचार्य संजय कांबळे आदींसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.





## विधानसभा निवडणूक लढवण्याचा केला आग्रह

# अभिषेक कळमकरांच्या कार्यकर्त्यांनी वाजवली तुतारी

**समाचार/नगर-दि.१२**

माजी महापौर आणि राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यकर्त्यांनी काल, गुरूवारी रात्री त्यांचा वाढदिवस साजरा केला. यावेळी कार्यकर्त्यांनी त्यांना विधानसभा निवडणूक लढवावी, असा आग्रह केला. तसेच कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे चिन्ह असलेली तुतारी देखील वाजवली. यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांनी कळमकर यांचे अभिष्टचिंतन केले. तसेच कार्यकर्त्यांनी तुतारी वाजवली.

# प्रयास ग्रुप शाखेच्या अध्यक्षपदी कुसुमसिंग

**समाचार/नगर-दि.१२**

महिला सक्षमीकरणासह महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी पंचवीस वर्षापासून कार्यरत असलेल्या प्रयास ग्रुप सावेडी शाखेच्या अध्यक्षपदी कुसुमसिंग यांची निवड करण्यात आली. सावेडी भागातील महिलांसाठी पौष्टिक व सकस आहाराच्या रेसीपीचा समावेश असलेल्या पाककला वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. पाककला वर्गाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

गुलमोहर रोड, येथील कमलाबाई नवले सभागृहात हा कार्यक्रम रंगला होता. कुसुमसिंग यांची निवड झाल्याबद्दल दादी-नानी ग्रुपच्या अध्यक्षा जया गायकवाड यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी उपाध्यक्षा कविता दरंदले, दादी नानी ग्रुपच्या सचिव शकुंतला जाधव, प्रयास ग्रुपच्या संस्थापक अध्यक्षा अलका मुंदडा, सचिव ॲड. ज्योत्सना कुलकर्णी, विद्या




बडवे, शशिकला झरेकर, शोभा कानडे, सुजाता पुजारी, वंदना गोसावी, सुरेखा बारस्कर, स्मिता वाल्हेकर आदी उपस्थित होत्या.कुसुमसिंग म्हणाल्या की, महिलांनी महिलांना आधार दिल्यास अनेक प्रश्नभ सुटणार आहे. प्रयास ग्रुपच्या माध्यमातून सावेडी मधील महिलांसाठी वर्षभर विविध उपक्रम राबवून प्रोत्साहन देण्याचे काम सुरु आहे. महिलांचा सर्वांगीण विकास व आरोग्याबरोबर जीवनात आनंद निर्माण करण्याचा उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अलका मुंदडा, दीपाली बिहाणी यांची भाषणे झाली. महिलांसाठी मेघना मुनोत यांनी विविध मनोरंजनात्मक व बौध्दिक स्पर्धा घेतल्या. यामधील विजेत्यांना बक्षीस देण्यात आली.

## जय युवा ॲकॅडमी, जिल्हा क्रीडा कार्यालयाचे योगदान

# फुले जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रमांची रेलचेल

**समाचार/नगर-दि.१२**

थोर समाज क्रांतिकारक, बहुजनांचे उद्धारक क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारधारेवर कार्य करण्याची गरज आहे. फुले, शाहू, आंबेडकर यांनी आपले आयुष्य समाजात समानता, न्याय, शिक्षण व समाजसेवेसाठी वेचले. या महापुरुषांच्या विचाराने समाजाला योग्य दिशा मिळणार आहे. त्यांची प्रेरणा घेवून समाज उपयोगी उपक्रम राबविणे परिवर्तनाची नांदी ठरणार असल्याचे प्रतिपादन मनपा आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी केले.

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त माळीवाडा येथे जय युवा अकॅडमी, जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने नागरिकांसाठी मोफत रक्तगट, हिमोग्लोबिन, स्त्री आरोग्य तपासणी, निसर्गोपचार शिबिराचे आयोजन करण्यात




आले होते. या शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी आयुक्त जावळे बोलत होते. प्रारंभी महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी आमदार संग्राम जगताप, प्रा. माणिक विधाते, सुहास सोनवणे, माजी महापौर भगवान फुलसौंदर, बाळासाहेब बोराटे, किशोर डागवाले, धनंजय जाधव, दत्ता जाधव, आम आदमी पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष भरत खाकाळ, महिला आघाडीच्या अध्यक्षा ॲड. विद्या शिंदे, प्रा. अशोक डोंगरे, रवी सातपुते, जय युवा ॲकॅडमीचे अध्यक्ष ॲड. महेश शिंदे, संभाजी कदम, विक्रम राठोड, प्रशांत ठोंबरे, श्रद्धा कांबळे, नम्रता साठे, सामाजिक कार्यकर्ते जालिंदर बोरुडे, विनायक नेवसे, रेश्मी आठरे, संगीता खिलारी, सुभाष आल्हाट आदी उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, महापुरुषांच्या जयंतीदिनी आरोग्य शिबिराच्या माध्यमातून समाजाची सेवा करण्याचे कार्य घडत असून, तेच खऱ्या अर्थाने महापुरुषांना अभिवादन ठरत असल्याचे त्यांनी सांगितले. भगवान फुलसौंदर, माणिक विधाते यांची भाषणे झाली.

## बाल चित्रपट महोत्सवात निवड : पुणेरी सन्मान

# 'वेल डन बॉईज' चित्रपटाला नगरच्या आशिषचा शब्दसाज...

**समाचार/नगर-दि.१२**

संवाद पुणे व कावरे आईस्क्रीम यांच्या सहयोगाने पुण्यात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय बालचित्रपट महोत्सवात प्रकाश जाधव दिग्दर्शित 'वेल डन बॉईज' या चित्रपटाची निवड झाली असून या चित्रपटाचे भव्य स्क्रिनिंग पार पडणार आहे.या चित्रपटाचे गीतलेखन येथील आशिष निनगुरकर यांनी केले असून त्यात छोटीशी भूमिका ही साकारली आहे.

लहान मुलांच्या जीवनावर 'वेल डन बॉईज' या चित्रपटाची कथा गुंफण्यात आली आहे. प्रकाश जाधव यांचे याअगोदरचे सिनेमे लहान मुलांच्या आयुष्यावर प्रकाश टाकणारे होते. साईनाथ चित्र निर्मित 'वेलडन बॉईज' या चित्रपटाचे लेखन अशोक बाफना व किशोर ठाकूर यांचे असून अशोक मानकर व महेंद्र पाटील यांनी संवाद लिहिले आहेत. गीतलेखन व सहाय्यक दिग्दर्शन आशिष निनगुरकर यांनी केले असून चित्रपटाचे छायांकन त्रिलोकी चौधरी,हितेश बेलडर व प्रकाश कारलेकर यांचे आहे.या चित्रपटाचे संकलन- दिग्दर्शन प्रकाश आत्माराम जाधव यांचे आहे.



## महात्मा फुले यांना अभिवादन

**समाचार/नगर-दि.१२**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त शिव प्रतिष्ठान हिंदुस्थान अहमदनगरच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले,यावेळी शहराचे प्रमुख देविदास मुदगल, रवी चवंडके, संतोष पठाडे, गणेश लाटणे, तानाजी देवकर, राहुल म्हसे, रमेश बनकर, अभी खंदारे, अतुल आंबेकर राहुल म्हसे आणि रमेश बनकर आदी उपस्थित होते.

## राष्ट्रवादी ओबीसीतर्फे दंत तपासणी शिबीर

# मूकबधिर विद्यार्थ्यांची सेवा हीच ईश्वर सेवा : आ. जगताप

**समाचार/नगर-दि.१२**

बहुजन समाजाला शिक्षणाचा हक्क आणि अधिकार मिळावा म्हणून क्रांतिसूर्य महात्मा फुले व सावित्रीबाईंनी घेतलेले कष्ट महत्त्वपूर्ण आहेत. त्यांच्या त्यागामुळेच बहुजन समाजाला शिक्षणाची कवाडे खुली झाली. मूकबधिर विद्यार्थ्यांची सेवा हीच ईश्वराची सेवा आहे. दंत तपासणी व फळ वाटप करुन त्यांची सेवा करण्याचे भाग्य आपल्याला मिळाले, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले. क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी विभागातर्फे नगर शहरातील टिळक रोड वरील जानकीबाई आपटे मूकबधिर विद्यालयातील २५ मुलांची दंत तपासणी करून व आ. संग्राम जगताप व राष्ट्वादी काँग्रेस ओबीसी विभागाचे शहर जिल्हाध्यक्ष अमित खामकर यांच्या हस्ते फळांचे वाटप



करण्यात आले. डॉ.अतुल मडावी यांनी विद्यार्थ्यांची दंत तपासणी केली.

याप्रसंगी राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, प्रा. माणिक विधाते, संजय सपकाळ, सुरेश बनसोडे, जय सपकाळ, केतन क्षीरसागर, शरद दातरंगे, भरत गारुडकर, लहू कराळे, तुषार टाक, मुख्याध्यापक विजय आरोटे, संतोष यादव, अनिल हिवाळे, एस. एम. कर्पे, शिवाजी विधाते, ज्ञानेश्वर रासकर, राहुल रासकर, रोहित पडोळे, शुभम आंबेकर, गणेश पांढरे, रोहित इवळे, मयूर जाधव आदी उपस्थित होते. डॉ. मडावी, अमित खांबकर यंची भाषणे झाली.

# खा. सुजय विखे यांनी महिला सक्षमीकरणावर दिला भर- अश्विनी थोरात

**समाचार/नगर-दि.१२**

जिल्ह्यातील महिलांचा सन्मान करण्यासाठी खासदार सुजय विखे यांनी अनेक महिला बचत गटांची निर्मिती केली. त्यांनी महिलांच्या सक्षमीकरणावर विशेष भर दिला आहे. सक्षमीकरणामुळे महिलांच्या कुटुंबाचा विकास झाला आहे, असे प्रतिपादन भाजपा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा आश्विनी थोरात यांनी केले.

थोरात म्हणाल्या की, जिल्ह्यातील बटत गटांमार्फत महिलांना रोजगार देऊन स्वावलंबी बनविण्ययात आले आहे. दोनशेपक्षा अधिक महिला बचत गटांना स्टॉलचे वाटप करण्यात आले आहे. पीठाची गिरणी, वजन काटा, पॅकींग मशीन, आदी साहित्यांचे वाटप करून त्यांना व्यवसायाची संधी उपलब्ध दिली, असेही त्या म्हणाल्या.



खा. विखे यांनी महिला व बाल कल्याण विभागाच्या माध्यमातून १६ कोटी ८१ लाख रुपये खर्च करून १०० खाटांचे अत्याधुनिक सुविधा असलेले सुसज्ज रुग्णालय उभे केले. अधिकमास महिन्यात महिलांना देवदर्शन यात्रेचे आयोजन केले. यामाध्यमातून त्यांनी धार्मिक कार्याला हातभार देखील लावला आहे, असे सांगून थोरात पुढे म्हणाल्या की, राज्य आणि केंद्र सरकारच्या योजना प्रभावीपणे राबवल्या. ग्रामीण भागातील महिलांना खा. विखे यांनी प्रधानमंत्री उज्वला योजनेच्या माध्यमातून नगर जिल्ह्यातील ३ लाखापेक्षा अधिक महिलांना या योजनेचा लाभ मिळवून दिला. त्यामुळे या महिलांचे आरोग्य आणि जीवनमान उंचावले.

गरोदर मातांना सकस आहार आणि आर्थिक लाभ मिळावा, त्यांचे मातृत्व सुखकर आणि आनंददायी व्हावे, यासाठी प्रधानमंत्री मातृवंदना योजनेच्या दीड लाखापेक्षा अधिक मातांना ६२ कोटीचा निधी मिळवून देण्यात आला आहे. याचा फायदा या निवडणुकीत खा. विखे यांना होईल, असा विश्वास आश्विनी थोरात यांनी व्यक्त केला.

## शिव संघर्ष मित्र मंडळाचा उपक्रम

# सामाजिक उपक्रमातून महात्मा फुले यांना अभिवादन

**समाचार/नगर-दि.१२**

बुरुडगांव रोड येथील शिव संघर्ष मित्र मंडळ, जय शंभो नारायण ग्रुप, श्रीराम चौक,श्रीरामनगर यांच्यावतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त वृक्षारोपण, वह्या-पुस्तके व महाप्रसाद वाटप करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी माजी उपमहापौर गणेश भोसले, ॲसड.बाळासाहेब मेहेत्रे, अतिश राऊत, ऋषिकेश आनंदकर, गणेश वाघ, विकी खरपुडे, संतोष राऊत, गणेश मेहेत्रे, बाळासाहेब मेहेत्रे, अभिषेक आनंदकर, मयूर आरडे, रियाज शेख, अनिकेत खंडागळे, स्वप्निल राऊत, गुड्डू राऊत, शिवा पटवेकर,राहुल उबाळे, राहुल गहीले, राजू महानुर, राम राऊत



आदि उपस्थित होते.

गणेश भोसले म्हणाले, महात्मा ज्योतिबा फुले यांनी शिवजयंती सारख्या उपक्रमातून युवकांचे संघटन करत समाज सुधारणेच्या कार्यात युवकांना सहभागी करुन घेतले. वंचित समाजाच्या हक्कांसाठी लढा देत समाज परिवर्तनात महात्मा फुले यांचे कार्य बहुमोल असेच आहे. त्यांचे विचारांवर या मंडळ व ग्रुपचे कार्यकर्ते सामाजिक उपक्रमातून प्रत्यक्षात अंमलात आणत आहेत. अशाच उपक्रमाची समाजाला गरज असल्याचे सांगितले. ॲड.बाळासाहेब मेहेत्रे यांचे भाषण झाले.

## हेल्थकेअर मार्केटिंग असो.च्या पदाधिकाऱ्यांचे पदग्रहण

# जनसंपर्क अधिकाऱ्यांनी संघटित व्हावे - कणसे

**समाचार/नगर-दि.१२**

हॉस्पिटल मार्केटिंग या क्षेत्रामध्ये त्या-त्या हॉस्पिटलच्या जनसंपर्क अधिकारी अर्थात पीआरओ हे खूप महत्त्वाची भूमिका बजावत असतात, त्यामुळे सदर हॉस्पिटलचा सेवाकार्य जनसामान्य, खेडोपाडीपर्यंत पोहोच करण्याचे कार्य हे जनसंपर्क अधिकारी अहोरात्र करत असतात. त्यामुळेच जनसंपर्क अधिकारी यांनी संघटित होऊन आपल्या स्वतः बरोबर हॉस्पिटलचा आणि संघटनेच्या माध्यमातून विकास करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन हेल्थकेअर मार्केटिंग असोशियन महाराष्ट्रचे संस्थापक अध्यक्ष धनंजय कणसे यांनी केले.

हेल्थकेअर मार्केटिंग असोसिएशन अहमदनगरच्या नवनियुक्त पदाधिकारी पदग्रहण समारंभ या कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमास राज्य सचिव मानसिंह चव्हाण, सदस्य श्रीकांत माने, सतीश भिसे, प्रकाश गाडे उपस्थितीत



होते.

ज्येष्ठ मार्गदर्शक सुनील उमाप, किशोर पोखरणा, संदीप साळवे, इरफान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली २०२४ व २०२५ या सालासाठी नवीन पदाधिकारी पदग्रहण समारंभ पार पडला. नवनियुक्ती कार्यकारिणी: अध्यक्ष - संपत पंडित, उपाध्यक्ष - महेश मोरे,सचिव - रंजीत घाडगे, सहसचिव- दत्ता दारकुंडे, खजिनदार - संतोष राहिंज, सहखजिनदार - डॉ.कैस रज्जाक शेख यांची नियुक्ती करण्यात आली. तर सोशल मीडिया कमिटी अध्यक्ष - सुरज काटकर, तंटामुक्ती कमिटी अध्यक्ष - विल्सन वंजारे, शैक्षणिक कार्यक्रम कमिटी अध्यक्ष - सोपान सुंबे, क्रीडा कमिटी अध्यक्ष - रोहन कुराटे, सांस्कृतिक कार्यक्रम कमिटी अध्यक्ष - राजेश पंडित, आरोग्य कमिटी अध्यक्ष - सरफराज शेख, संचालक - आप्पा ढोबे, दत्ता चव्हाण, सौरभ वैरागर. कार्यक्रमास हेल्थ केअर मार्केटिंग असोसिएशनचे माजी अध्यक्ष गौतम आढाव, माजी खजिनदार जवरे, सुनिल भिसे, शैलेश सदावर्ते, प्रमोद आव्हाड, अतुल जोशी, मोहम्मद सय्यद, चांगदेव आंबेडकर, अमित धारक, राहुल घाडगे, संतोष शेळके, अक्षय साठे, स्वप्निल पंडित, जयसिंग दळवी व इतर आजी-माजी सर्व संचालक मंडळाचे सदस्य यांच्या उपस्थित होते.

# के. जी. महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रम उत्साहात



**समाचार/नगर-दि.१२**

के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून धनेश गांधी व न्यु आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व अर्थशास्त्राचे प्राध्यापक खासेराव शितोळे उपस्थित होते. गांधी यांनी विद्यार्थांसाठी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो. अशा स्पर्धा व कार्यक्रम हे विद्यार्थांना स्पर्धात्मक युगात पुढे घेवून जाण्यात मदत करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनीही आवर्जून सहभाग नोंदवावा, असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. शितोळे यांनी विद्यार्थांनी अधिकाधिक सजग राहून ज्ञान संपादन करावे. आपले उज्ज्वल भविष्य घडवावे, असे मार्गदर्शन विद्यार्थांना केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले महाविद्यालयाचे विश्वस्त संचालक किशोर मुनोत यांनी विद्यार्थांनी स्वतःला घडवावे व वेळेचा सदुपयोग करुन जास्तीत जास्त वाचन करावे, असे सांगितले. महाविद्यालयाच्या परिसर संचालिका प्रा. डॉ.स्वाती मुनोत यांनी प्रास्ताविकामध्ये महाविद्यालयाची आतापर्यंतची प्रगती व रूपरेषा स्पष्ट केली. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

मराठी विभाप्रमुख डॉ. वर्षा कीर्तने यांनी सूत्रसंचालन केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. स्नेहल बोरावके यांनी करुन दिला. पारितोषिकाचे वाचन प्रा. आरती खेडकर यांनी केले. आभार अमृता मुळे यांनी मानले. याप्रसंगी प्रा. डॉ. राहुल थोरात, प्रा. सविता चव्हाण, संतोष मुनोत, हर्षाली रासकर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सिया बाफनाच्या स्केचचे ‘जितो’ कार्यक्रमात कौतुक

# विद्यार्थिनीच्या पेन्सिलीतून रेखाटले गोविंददेव गिरी महाराजांचे स्केच



**समाचार/नगर-दि.१२**

कला ही संस्कारांचा एक भाग असून खरी कला ही आत्म्याचा अविष्कार असते तसेच खरी कला ही ईश्वराचे भक्तीपूर्ण अनुसरण करते हे कु. सिया बाफना हिच्या कलेने नुकतेच पुण्यात दाखवून दिले. जितो च्या कार्यक्रमात स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांचे काढलेले पेन्सील स्केच त्यांनाच भेट देवून त्यांचा सत्कार करण्यात आला. या स्केचचे भरपूर कौतुक झाले.

जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो) संघटनेच्या पुणे विभागाचा १८ वा वर्धापनदिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी स्वामी श्री गोविंददेव महाराज यांचे हस्ते समाजातील मान्यवरांना जीवन गौरव सेवा तसेच इतर पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. श्रीरामपूर येथील विद्यार्थिनी सिया बाफना हिने पेन्सीलने काढलेले स्वामी श्री गोविंददेव गिरी यांचे स्केच स्वामींना भेट देवून सत्कारित करण्यात आले.

यावेळी प्रमिला साकला यांना जीवन गौरव, औद्योगिक क्षेत्रातील योगदानाबद्दल सुजय उदयबाबु सामाजिक सेवेसाठी विनोद राठोड, व्यावसायिक सुजित जैन, युवा उद्योजक सुधेंदु शहा, डॉ. प्रज्ञा लोढा तसेच संस्थापक कार्यासाठी श्रुतभवन श्रुतदीप रिसर्च फाऊंडेशन यांचा गौरव करण्यात आला. यावेळी अभय मुतडा, सौरभ बोरा, राजेशकुमार साकला, चेतन भंडारी, दिनेश ओसवाल, ॲड. विशाल शिंगवी, कांतीलाल ओसवाल, विजय भंडारी, ॲड. एस.के. जैन, विजयकांत कोठारी, इंदर जैन, अचल जैन, धीरज छाजेड, संगीता ललवाणी, विशाल जोरडिया, अजय, अजित सेठिया, इंदरकुमार छाजेड, प्रकाश धारिवाल उपस्थिथ होते.

# काकासाहेब म्हस्के कॉलेजमध्ये होमिओपॅथी दिन साजरा



**समाचार/नगर-दि.१२**

शहरातील काकासाहेब म्हस्के मेमोरियल मेडिकल फाउंडेशनच्या काकासाहेब म्हस्के होमिओपॅथीक मेडिकल कॉलेजमध्ये जागतिक होमिओपॅथी दिन तसेच होमिओपॅथीचे जनक डॉ. सॅम्युअल हनेमन यांची २६९ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी फाउंडेशनचे कार्यकारी विश्वस्त डॉ. सुभाष म्हस्के म्हणाले की, होमिओपॅथीचे संस्थापक डॉ. सॅम्युअल हनेमन यांचा १० एप्रिल हा जन्मदिवस असून त्यानिमित्ताने दरवर्षी या दिवशी जागतिक होमिओपॅथी दिन साजरा केला जातो. होमिओपॅथी उपचार पद्धती जगभरात प्रसिद्ध आहे, कारण होमिओपॅथीच्या उपचारावरचा लोकांचा विश्वास वाढला आहे. होमिओपॅथीच्या गोळ्यांचा दुष्परिणाम होण्याची शक्यता कमी असल्याने तसेच होमिओपॅथी उपचारामुळे अनेक आजार पूर्णपणे बरे होत असल्यामुळे रुग्णांचा कल दिवसेंदिवस होमिओपॅथीकडे वाढत आहे. होमिओपॅथी या चिकित्सा पद्धतीचा जन्म जर्मनमध्ये झाला असला, तरी ती भारतात खूप लोकप्रिय असल्याचे ते म्हणाले. जागतिक होमिओपॅथी दिन २०२४ साठी खास थीम निवडण्यात आली असून होमिओपॅथीच्या क्षेत्रात संशोधनावर भर देणे आणि कुशलता वाढवणे ही यावर्षीची थीम असल्याचे प्राचार्या डॉ. अनुराधा पाटणकर म्हणाल्या. विद्यार्थ्यांनी होमिओपॅथीविषयी नाटक सादर केले. डॉ.अजित फुंदे यांनी होमिओपॅथीचे महत्त्व सांगितले. यावेळी संस्थेचे मुख्य प्रशासक आर्किटेक्ट समीर ठाकरे, डॉ.गोरे, डॉ. जोशी, डॉ.नुसरत, डॉ.बोरा, डॉ. शहाणे, डॉ.पाठक, डॉ.सारडा, डॉ.वैराळ, डॉ. घुगे, डॉ.डोंगरे आदी उपस्थित होते.





टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात
दिनांक – १२ एप्रिल ते १८ एप्रिल २०२४



| | |
|---|---|
| बडे मियाँ छोटे मियाँ | 8.00 AM, 11.15 AM, 2.20 PM, 4.25 PM, 7.45 PM, 10.00 PM, 10.55 PM |
| मैदान | 8.15 AM, 11.45 AM, 1.00 PM, 3.15 PM, 8.45 PM, 10.15 PM |
| स्वातंत्र्यवीर सावरकर | 9.30 AM |
| GODZILLA X KONG | 5.30 PM |
| CREW | 7.30 PM |

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher * - Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse
AVAILABLE ON book my show CONNPLEX AVAILABLE ON book my show
3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

नवीन रो-बंगले विकणे
बोल्हेगाव येथे सर्व सुविधांयुक्त उत्तम लोकेशन व क्वॉलिटीचे सलग ३ नवीन रो-बंगले विकणे आहेत.
-किंमत-
1 RK रू.१७.५० लाख
1 BHK रू.२५.५० लाख
एजंट/ब्रोकर स्वागतार्ह
-: संपर्क :-
9273448462




UNITED PHARMA Pharmaceutical Distributors
Sargical & Generic Medicine
9049934444
7972378081
Near Kedgaon Ves, Kedgaon

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
वाईट सवयीचे दुष्परिणाम / स्वप्नदोष / धातुपात / शीघ्रपतन / असमाधान कमजोरी / शुक्राणुंची कमी / गुप्तरोग / त्वचारोग / नपुंसकत्व / मानसिक नैराश्य
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
२७ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॉथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहमदनगर
संपर्क: 94 22 23 90 13 ▪ www.sextreatment.in

m डागा
शांतीलाल डागा
दाळमंडई/मार्केट यार्ड, अहमदनगर.
फोन नं. ७५८८११५१५७, ९८२२०८१४४०
शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्रल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकामाची रांगोळी

SASE DCORATERS

Mandap, Light & Flower Decoraters
Add. Katvan Khandoba Road, Ahmednagar
9822331006, 9579544110

